# डॉ आंबेडकरांच्या सामाजिक चळवळीमागील वैचारिकता.

**डॉ. सुनिता गोरख रोकडे** आदर्श कॉलेज विटा -rokadesunita50@gmail.com

---

**प्रस्तावना:**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अर्थशास्त्र राज्यशास्त्र, समाजशास्त्र, शिक्षणशास्त्र, धर्मशास्त्र, मानववंशशास्त्रज, नीतीशास्त्र,कायदा इ. अभ्यासाबरोबर जगातील साम्राज्यशाही ,भांडवलशाही अशा क्रांत्यांचा अभ्यास करून जागतिक स्तरावर गुलामगिरी, दलितत्व दूर करण्यासाठी विविध सामाजिक चळवळी उभ्या केल्या.डॉ. आंबेडकरांनी दलित समाजातील माणसाला सामाजिक आणि धार्मिक ,आर्थिक ,मानसिक गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी त्याचबरोबर आत्मसन्मान, स्वाभिमान, अस्मिता व स्वसामर्थ्याची जाणीव विविध सामाजिक चळवळीच्या माध्यमातून निर्माण केले. डॉ. आंबेडकरांचा विविध सामाजिक चळवळींच्या मागील वैचारिकता अभ्यासणार आहोत

**माणगाव परिषद:**

आंबेडकर हे माणपरिषदेचे अध्यक्ष होते. जन्मसिध्द योग्यता व पवित्रता यांच्या आधारे आंबेडकरांनी २१ व २२ मार्च १९२० रोजी माणगाव येथे भरलेल्या परिषदेमध्ये जन्मसिद्ध योग्यतेपेक्षा व दलित व अस्पृश्यतेच्या वागणुकीमुळे बहिष्कृत वर्गाचे मोठे नुकसान झाले आहे. अस्पृश्यांना व्यापार, नोकरी व शेती या धनसंचयाचे मार्ग खुले नाहीत अस्पृश्यतेच्या कल्पनेमुळे त्यांना ग्राहक मिळत नाहीत, नोकरी मिळत नाही, सार्वजनिक विहिरीवर पाणी भरता येत नाही, वाहनांचा उपयोग करता येत नाही हे आंबेडकरांनी भाषणात स्पष्ट केले. तेव्हा बहिष्कृत वर्गात नैसर्गिक गुणांची वाण नाही, परंतु सामाजिक परिस्थिती अनुकूल नाही जातवार प्रतिनिधित्व मिळाल्याशिवाय आपल्या हाती सामाजिक, राजकीय सामर्थ्य येणार नाही असे आंबेडकरांचे मत होते. ब्राह्मण-ब्राह्मणेतर हे समाजाचे वर्गीकरण आंबेडकरांना मान्य नव्हते. ब्राह्मणेतर व बहिष्कृत जातीत रोटी-बेटी व्यवहार होत नाही म्हणून त्यांच्यात ऐक्याची भावना निर्माण होत नाही हा टिळकांचा युक्तिवाद आंबेडकरांना मान्य होता.

छत्रपती शाहू महाराजांनी याच परिषदेतील भाषणामध्ये पाच ते सहा हजार लोकांच्या उपस्थितीत आंबेडकरांच्याकडे बोट दाखवून म्हटले, की हेच तुमचे खरे पुढारी आहेत, हे तुमचाच नव्हे तर तुम्हा-आम्हा सर्वांचा उद्धार करतील अशा प्रकारचे गुण त्यांच्या अंगी आहेत.माणगाव परिषद ही आंबेडकरांच्या नेतृत्वाच्या उभारणीतील महत्त्वाचा टप्पा आहे. या परिषदेत शाहू महाराजांनी त्यांच्या नेतृत्वावर वरचं शिक्कामोर्तब केला त्यामुळे त्यांचे नेतृत्व पुढे येण्यास मदत झाली

**बहिष्कृत हितकारणी सभा:**

डॉ. आंबेडकरांनी अस्पृश्य वर्गाच्या सामाजिक व राजकीय अडचणी सरकारपुढे मांडण्यासाठी एक मध्यवर्ती संस्था असावी.या विषयी विचार विनिमय करून अस्पृश्य समाजातील सर्व कार्यकर्त्यांच्या उपस्थितीमध्ये २० मार्च १९२४ रोजी “बहिष्कृत हितकारणी सभा” ही संस्था स्थापन केली. या सभेचे कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष स्वतः डॉ. आंबेडकर होते.या सभेपूर्वी महाराष्ट्रमध्ये प्रामुख्याने अस्पृश्य समाजाच्या उद्धारासाठी कार्य सुरू केले होते.परंतु त्यामुळे अस्पृश्यांमध्ये स्वाभिमान,स्वावलंबन निर्माण झाले नाही, आत्मोन्नीतीची भावना निर्माण झाली नाही. त्यामुळे अस्पृश्यांना सामाजिक व धार्मिक गुलामगिरीतून मुक्त करण्याच्या हेतूने अस्पृश्यांमध्ये असणारी हालअपेष्टा, दुःख ,अपमान, दारिद्र यापासून मुक्ती देण्यासाठी अस्पृश्यांना त्यांचे हक्क मिळवून देण्यासाठी डॉ आंबेडकरांनी बहिष्कृत हितकारणी सभेची स्थापना केली

या संस्थेच्या अंतर्गत बहिष्कृत समाजात शिक्षणाचा प्रसार करणे ,बहिष्कृत वर्गात जागृती करणे त्यासाठी प्रचारक नेमणे, विशेषकरून समाजात उच्चसंस्कृतीची वाढ करण्यास ठिकठिकाणी वाचनालय, शैक्षणिक वर्ग ,स्वाध्याय केंद्र उघडणे, तसेच त्यांची सांपत्तिकस्थिती सुधारण्यासाठी औद्योगिक व शेतीविषयक शाळा चालवणे असे अनेक उद्दिष्ट पुढे ठेवून हीसंस्था कार्यरत होती.या संस्थेचे ब्रीदवाक्य होते “शिका,संघटित व्हा व लढा दया” हे या संघटनेचे ब्रीदवाक्य होते. बहिष्कृत हितकारणी सभेने काही अंशी का होईना दलित समाजात जागृती निर्माण झाली. अस्पृश्य तरुणांना दिशा मिळाली .या संस्थेच्या माध्यमातून आंबेडकर आणि आपल्या जीवित कार्याची मुहूर्तमेढ रोवली असे धनंजय कीर यांनी आंबेडकर चरित्र लेखनामध्ये लिहिले आहे. ‘बहिष्कृत हितकारणी सभेची स्थापना म्हणजे भारतातील पददलितांना स्वावलंबन स्वाभिमान नि आत्मोद्धार यांची शिकवण देऊन देशात महापरिवर्तन घडवून आणणाऱ्या युगाचा प्रारंभ होय.’ या सभेतर्फे विविध जिल्ह्यातून लोकजागृतीसाठी सभा भरवण्यात येत असत. अन्न, वस्त्र, निवारा मिळवण्याचा इतर भारतीयांप्रमाणे अस्पृश्यांनाही अधिकार आहे अशा प्रकारचे विचार परिषदेत मांडून डॉ. आंबेडकर स्वतः खेडी व शहरात जाऊन दलितांना जागृत करण्याचे काम करीत. बहिष्कृत हितकारणी सभेच्या वतीने वसतिगृहे चालवली गेली. विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाची आवड निर्माण व्हावी व त्यांच्यात समाजसेवेची वृत्ती वाढावी यासाठी हस्तलिखित सुरू करण्यामागचा हेतू होता.तसेच तरुण व प्रौढां मध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी रात्रीची शाळा व वाचनालये चालवली, क्रीडा मंडळे स्थापन केली.

**समता सैनिक दल:**

डॉ. आंबेडकर यांनी स्वतः “समाज समता संघाची” स्थापना ४ सप्टेंबर १९२७ रोजी केली.या संस्थेचे ध्येय अत्यंत व्यापक होते. सर्व माणसे समान आहेत. माणसाच्या विकासासाठी आवश्यक असणाऱ्या साधनांवर व संधीवर प्रत्येक माणसाला समान हक्क आहे अशी या संस्थेची धारणा होती. सामाजिक समतेच्या तत्त्वावर या संस्थेचा विश्वास होता. सामाजिक समतेचे तत्व हे समाजाच्या

स्थैर्यासाठी आवश्यक आहे. नीतीच्या भक्कम पायावर समाजाची उभारणी करायची असेल तर समाजाच्या प्रत्येक घटकाला धार्मिक, सामाजिक, राजकीय व आर्थिक क्षेत्रात समतेचे तत्व लागू करणे आवश्यक आहे अशी या संस्थेची धारणा होती.

डॉ.आंबेडकरांनी स्वतः या संस्थेची उद्दिष्टे पुढील प्रमाणे ठरवली होती१. समतेचा हक्क हा पवित्र ,अबाधित, अभेद आहे.२. हा हक्क वर्ण पंथ, जात व स्त्री-पुरुष भेदातीत आहे.3. सामाजिक समता अस्तित्वात आल्याशिवाय समाजाचा सामुदायिक जीवनक्रम सुरळीत चालणे अशक्य आहे. या समाज समता संघातर्फे जातीभेद मोडण्याची चळवळ म्हणून सहभोजनाचे कार्यक्रम हाती घेण्यात आले तसेच वैदिक विवाह पध्दती महार समाजात रूढ करण्याचा उपक्रम हाती घेण्यात आला. काही विवाह वैदिक पध्दतीने लावण्यात आले. यासंदर्भात स्वतः डॉ. आंबेडकर १२ जुलै १९२९ बहिष्कृत भारत मध्ये लिहितात, समाज समता संघाची चळवळ सुरु होऊन त्या चळवळीचा अस्पृश्यता निर्मूलनाच्या कामी उपयोग होऊ लागला. अस्पृश्य मानलेल्या जातीतल्या लोकांची मौजीबंधने होऊन ते यज्ञोपवित धारण करू लागले, गायत्री मंत्राचा उच्चार करू लागले, सहभोजने व थोडे का होईना भिन्न जातीय वधू-वरांचे विवाह होऊ लागले. त्यामुळे चातुर्वर्ण्याच्या नावाखाली समाजात विषमतेचे साम्राज्य माजवू पाहणाऱ्या आणि स्वतःची जाती श्रेष्ठता मिरवणाऱ्या लोकांच्या काळजात धडकी भरली आहे". समता हे सार्वजनिक नीतीचे एक मुख्य तत्त्व आहे राजकीय सामाजिक धार्मिक आणि आर्थिक याबाबत समतेचे तत्त्व लागू करणे म्हणजे समाजरचना नीतीच्या पायावर करणे होय असे आंबेडकर यांचे स्पष्ट मत होते.( पृष्ठ **135**)

**महाडचा सत्याग्रह:**

१९ व २० मार्च १९२७ रोजी महाड मध्ये डॉ. आंबेडकरांच्या अध्यक्षतेखाली भरली. महाड येथे चवदार तळ्याचे पाणी पशु, पक्षी, जनावरे मुसलमान वगैरे परधर्मीय लोक पीत असत. अस्पृश्यांना मात्र येथील पाणी पिण्यास परवानगी नव्हती ."चवदार तळयावर जायचे ते पाणी पिण्यासाठी नव्हे. इतरांप्रमाणे आम्ही माणूस आहोत हे सिद्ध करण्याकरिताच त्या तळयावर आपणास जावयाचा आहे. म्हणजे ही सभा समतेची मुहुर्तमेढ रोवण्यासाठी बोलवण्यात आली आहे हे उघड आहे"( पृष्ठ 138) हिंदू समाज समर्थ करायचा असेल तर चतुरवर्ण व अस्पृश्यता यांचे उच्चाटन करून हिंदू समाजाची रचना एकवर्णत्त्व व समता या दोन तत्त्वांच्या पायावर केली पाहिजे असे मत मांडले.

२० मार्च १९२७ रोजी आंबेडकर व त्यांच्या अनुयायांनी महाडच्या चवदार तळयाचे ओंजळकर पाणी पिलेकेवळ ठरावच नव्हे तर प्रत्यक्ष कृती केली गेली. या दिवसाचे महत्त्व सांगताना धनंजय कीर लिहितात, "भारताच्या तीन सहस्त्र वर्षाच्या इतिहासातील परममंगल असा तो भाग्याचा दिवस, माणुसकी अन् समतेचा संदेश भारतास देणारा तो सोन्याचा दिन म्हणजे२० मार्च १९२७ हा दिवस होय! आंबेडकरांच्या जीवनातील परमभाग्याचा तो दिवस! त्या दिवसापासून आंबेडकरांच्या कीर्तीच्या लाटा एकामागून एक सर्व देशभर पसरत राहिल्या"( पृष्ठ१४३) भारतात नवीन युग सुरू झाल्याची न हंदू समाजाला जाग आणणारी तुतारीतून बाहेर पडलेली ती ललकारीच होती. केवळ एका तासात ३८८४ लोकांनी सत्याग्रह करण्याची तयारी असल्याबद्दल नावे नोंदवली; जमलेल्या प्रतिनिधींची प्रचंड मिरवणूक महाड शहरातून काढण्यात आली सवर्ण कुटुंबातील स्त्री पुरुष त्यावेळी रस्त्यावर दिसत नसले तरी आंबेडकरांना पाहण्यासाठी व त्यांचे विचार ऐकण्यासाठी महार समाजातील स्त्रिया अर्धा मैल अंतरावरून पायी चालत आल्या होत्या. हिंदू समाजाच्या आजवरच्या इतिहासातअशा दर्जाची, तोडीची उद्दिष्टांची परिषद कधी झाली नाही असेही मत बी. सी .कांबळे नोंदवतात. या परिषदेचे वर्णन" हिंदू धर्म वर्ण निर्मूलन परिषद" या शब्दात ते करतात. महाडचा सत्याग्रह यावर आंबेडकरांनी बहिष्कृत भारत मध्ये जे ३ अग्रलेख लिहून सवर्ण, सरकार अस्पृश्य यांची महाड प्रकरणात जबाबदारी कोणती त्याची छाननी तीन अग्रलेखात केली .या तीन अग्रलेखातून बाबासाहेबांची दूरदृष्टी, कळवळ व विविधता दिसून येते.

**मनुस्मृतीचे दहन:**

२५ व २६ डिसेंबर १९२७ रोजी महाड येथे सत्याग्रह परिषद पार पडली. या परिषदेतच मनुस्मृती या ग्रंथाचे दहन झाले. मनुस्मृती हा ग्रंथ दहनाचा कार्यक्रम पूर्वनियोजित होता.पण मनुस्मृतीचे दहन का केले या बाबत डॉ. आंबेडकर लिहितात ,आम्ही मनुस्मृतीचे वाचन केले आहे. त्यावरून आमची खात्री झाली आहे, की या ग्रंथात शूद्र जातीचे निंदा करणारे, त्यांचा उपमर्द करणारी , कुटाळ उत्पत्तीचा कलंक माथी मारणारी व त्यांच्याविषयी समाजात अनादर वाढवणारी वचने ओतप्रोत भरली आहेत. त्यात धर्माची धारणा नसून असमतेची मात्र धुळवड घातली आहे स्वनिर्णयाचे तत्त्व प्रस्थापित करावयास निघालेल्या सुधारणावादयास असला ग्रंथ कधीच मान्य होणे शक्य नाही व तो अस्पृश्य वर्गासही मान्य नाही. एवढेच दर्शविण्याकरिता महाड येथे त्याची होळी करण्यात आली." मनुस्मृतीमध्ये सांगितले आहे की शूद्र लोकांनी अमंगळ राहावे.भिक्षा मागावी, धनसंचय करू नये मेलेल्या जनावरे ओढून न्यावीत. होळी करणे हा निषेध दर्शवणाऱ्या अनेक प्रकारांपैकी एक प्रकार आहे. तो प्रकार काही रानटीपणाचा आहे असेही म्हणता यावयाचे नाही. निषेध दर्शविण्याचा मुख्य हेतु म्हणजे ज्यांच्याविरुद्ध आपण निषेध प्रदर्शित करतो त्याला लाज वाटावयास लावून व त्याच्यात विचारजागृती करून त्यांच्या वर्तणुकीत योग्य तो फेरबदल करून आणण्याचा प्रयत्न असतो. मनुस्मृती जाळून तो निषेध आम्ही व्यक्त केला. त्यात ब्राह्मण्याचा म्हणजे हिंदू समाजातील उच्चनीच भावनेचा इन्कार व्यक्त करण्याचा आमचा हेतू होता.ब्राह्मण्य ग्रस्त लोक आमच्या वर्तणुकीत फेरबदल करतील अशी आमची आशा आहे व त्या आशेनेच हे सर्व काही केले आहे. धनंजय कीर लिहितात "२५ डिसेंबर १९२७ हा भारताच्या इतिहासातील एक अत्यंत क्रांतिकारक दिवस गणला जाईल त्या दिवशी आंबेडकरांनी जुनी स्मृती जाळून हिंदूंच्या सामाजिक पुनर्रचनेला उपयोगी पडेल अशा नव्या स्मृतीची मागणी केली

**नाशिकचा काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रह:**

नाशिकचे काळाराम मंदिर सत्याग्रहाचे नेतृत्व स्वतः आंबेडकरांनी केले.२ मार्च १९३० रोजी नाशिक येथे सत्याग्रह सुरू झाला. राम मंदिरात प्रवेश न मिळाल्यास आपण सत्याग्रह करणार आहोत. अशी लेखी सूचना काळाराम मंदिराच्या व्यवस्थापकास सत्याग्रह समितीच्यावतीने देण्यात आली. पाच हजार अस्पृश्य लोकांची मिरवणूक रामकुंडाजवळील भव्य पटांगणात आली सवर्णांनी या मिरवणुकीतील मंडळींवर जोरदार दगडफेक केली. स्पृश्य-अस्पृश्य यांच्यात हाणामारी झाली. काही जखमी झाले त्या मिरवणुकीस अस्पृश्यानी प्रत्युत्तर दिले होते एप्रिल १९३२ ला काळाराम मंदिरात अस्पृश्यांना प्रवेश करण्याचा प्रयत्न केला त्यात काही स्त्रियाही सहभागी होत्या. मंदिरात प्रवेश करण्याचा प्रयत्न केला म्हणून १४ अस्पृश्य स्त्रिया व व तेवढ्याच पुरुषांना अटक करण्यात आली. नाशिकच्या काळाराम मंदिरात प्रवेश मिळावा म्हणून सतत तीन वर्षे अस्पृश्यांनी लढा दिला. त्या काळात अस्पृश्यांना मारहाण झाली, तुरुंगात जावे लागले. वास्तविक २ मार्च १९३० ला जेव्हा नाशिक येथे सत्याग्रह सुरू झाला तेव्हा त्या सत्याग्रह बाबत आंबेडकर यांनी आपली भूमिका पुढीलप्रमाणे मांडली. ते म्हणाले होते मंदिरप्रवेश आणि तुमचा प्रश्न सुटेल असे मुळीच म्हणता येणार नाही. आपल्या प्रश्नांचे स्वरूप व्यापक आहे. आजचा हा आपला काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रह उच्चवर्णीय हिंदू मनास एक प्रकारचे आव्हान आहे. आम्ही उच्चवर्णीय हिंदू मनाची परीक्षा घेत आहोत आम्हाला माहित आहे दगडाचा देव आहे. त्याचे दर्शन झाल्याने व त्याची पूजा आमचा सर्वस्वी प्रश्न सुटणार नाही पण आमचा सत्याग्रह हिंदूंच्या मनात बदल घडवून आणण्याचा आहे हे मंदिर प्रवेशासंबंधीचे आंबेडकरांनी आपली भूमिका एका पत्रकान्वये मांडली आहे

या सत्याग्रहामुळे अस्पृश्य व्यक्तींच्या मनांमध्ये जागृती निर्माण झाले त्यामध्ये स्त्रियांचाही सहभाग होता. काही स्त्रिया तुरुंगात गेल्या स्त्रियांच्या मनामध्ये जागृती निर्माण करण्याचे काम त्यामुळे साध्य झाले वृत्तपत्रे कायदा न्यायव्यवस्था पोलीस यंत्रणाही तरी त्यांच्या बाजूने नसतात याचा अनुभव सत्याग्रहयांना दलितांना व नेत्यांना झाला

**येवला परिषद व धर्मांतराची घोषणा व धर्मांतर:**

येवला येथे मुंबई इलाखा दलितवर्गीय परिषद' १३ ऑक्टोबर २९३५ रोजी झाली. त्यामध्ये डॉ.आंबेडकरांनी घोषणा केली 'की मी हिंदू म्हणून जन्माला आलो असलो तरी हिंदू म्हणून मरणार नाही'या धर्मांतराच्या घोषणे मागे संपूर्ण समाज परिवर्तनाचा विचार होता. हिंदू धर्मात राहून दलित समाजाची प्रगती होणार नाही त्यासाठी हिंदू धर्म सोडावा लागेल तरच अस्पृश्यता संपुष्टात येईल. दलित समाजाला स्वाभिमानी जीवन जगता यावे हा त्यापाठीमागे विचार होता. येवला येतील धर्मांतराच्या घोषणेनंतर २१ वर्षांनंतर त्यांनी १४ ऑक्टोबर१९५६ रोजी लाखो समाज बांधवासह नागपूर येथे बौद्ध धर्माचा स्वीकार केला. ते म्हणतात मी अशा धर्माला मानतो तो स्वतंत्रता, समता, बंधुता शिकवतो

**निष्कर्ष**

- डॉ. आंबेडकरांचा सामाजिक समतेवर विश्वास होता. सर्व माणसे समान आहेत. समाजाच्या स्थैर्यासाठी सामाजिक धार्मिक राजकीय व आर्थिकते बरोबर धार्मिक समानतेचे तत्व लागू करणे गरजेचे आहे असे त्यांचे स्पष्ट मत होते
- दलित समाजामध्ये शिक्षणाचा प्रचार झाल्याशिवाय स्वाभिमान, स्वावलंबन आणि आत्मोद्धाराची भावना निर्माण होणार नाही. त्यासाठी डॉ. आंबेडकरांनी 'शिका संघटित व्हा आणि संघर्ष' करा हा विचार दलित समाजाला देऊन प्रेरित केले.
- जन्मसिद्ध योग्यतेपेक्षा सामाजिक दुय्यमत्त्वाच्या वागणुकीमुळे दलित समाजाचे मोठे नुकसान होते आणि त्यासाठी जातवार प्रतिनिधित्व मिळाले पाहिजे हा विचार समाजापुढे मांडला.
- डॉ.आंबेडकरांनी मनुस्मृतीदहनाच्या माध्यमातून आम्ही उच्चनेच्या भावनेचा इन्कार करतो, व ब्राह्मणग्रस्त लोकास फेरविचार करण्यास, दलितांच्या बद्दल असणाऱ्या आपल्या आचार विचारात बदल करतील अशी भावना व्यक्त केली.
- काळाराम मंदिर प्रवेशासंदर्भात डॉ आंबेडकर म्हणतात की मंदिर प्रवेशांनीआमचा प्रश्न सुटणार नाही परंतु दलित बांधवांच्यामध्ये जागृती निर्माण करण्यासाठी आणि हिंदूंचे मन परिवर्तन करणे हा त्यामागचा उद्देश आहे यातून त्यांची दूरदृष्टी दिसते

**संदर्भ ग्रंथ**

1. लिंबाळे शरण कुमार 'भारतीय दलित साहित्य',
2. डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ
3. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक 'मराठी वांग्मय चळवळीचा अभ्यास' पृ १५
4. व्यवहारे विद्या 'साहित्य विमर्श' चिन्मय प्रकाशन औरंगाबाद प्रथम आवृत्ती २००३ पृष्ठ क्रमांक ८५
5. फडके भालचंद्र दलित साहित्य वेदना आणि विद्रोह श्री विद्या प्रकाशन पुणे तिसरे आवृत्ती २००० पृष्ठ क्रमांक २१ व २२
6. कोतापल्ले नागनाथ, 'साहित्याचा अन्वयार्थ' मेहता पब्लिसिंग हाऊस पुणे प्र आ पृ क२८